# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:24.02.2025** **वारःसोमवार**

---

- अंतराळ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील भारताच्या प्रगतीचं जगभरात कौतुक होत असल्याचं पंतप्रधानांचं मन की बातमधून प्रतिपादन
- ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची दिल्लीत सांगता
- अभिजात मराठी भाषेला उचित वैभव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार - उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही
- छत्रपती शिवरायांच्या किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळवण्यासाठी राज्य सरकारचं शिष्टमंडळ पॅरिसला रवाना
- ज्येष्ठ साहित्यिक अनंत भावे यांचं पुण्यात निधन आणि
- चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत भारताचा पाकिस्तानवर सहा गडी राखून विजय

**<u>मनकीबात</u>**

अंतराळ क्षेत्र तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात भारत करत असलेल्या प्रगतीचं जगभरात कौतुक होत असून या क्षेत्रातला युवकांचा वाढता सहभाग नव्या क्रांतीला जन्म देत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमातून काल त्यांनी जनतेशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा ११९वा भाग होता.

आपल्या भाषणात इस्रोच्या अभिमानास्पद कामगिरीचा त्यांनी आढावा घेतला. इस्रोनं गेल्याच महिन्यात शंभरावं रॉकेट प्रक्षेपित केल्याचं सांगून अवकाश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. ते म्हणाले -----

***यह केवल एक नंबर नहीं है, बल्कि इससे space science में नित नई ऊंचाइयों को छूने के हमारे संकल्प का भी पता चलता है | Launch vehicle का निर्माण हो, चंद्रयान की सफलता हो, मंगलयान हो, आदित्य L-1 या फिर एक ही rocket से, एक ही बार में, 104 satellites को space में भेजने का अभूतपूर्व mission हो – इसरो (ISRO) की सफलताओं का दायरा काफी बड़ा रहा है | बीते 10 वर्षों में ही करीब 460 satellites launch की गई हैं और इसमें दूसरे देशों की भी बहुत सारी satellites शामिल हैं***

येत्या काही दिवसांत साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान दिनाचं स्मरण करून देत मुलांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करणं आवश्यक असल्याचं मोदी यांनी सांगितलं. 'वैज्ञानिक म्हणून एक दिवस' ही संकल्पना त्यांनी मांडली. नागरिकांनी आपल्या सोयीचा दिवस निवडून त्या दिवशी एक शास्त्रज्ञ, एक वैज्ञानिक म्हणून जगून पाहावं, संशोधन प्रयोगशाळा, तारांगणं किंवा अंतराळ संशोधन केंद्रांना भेट द्यावी, असं आवाहन त्यांनी केलं.

आगामी महिला दिनाच्या निमित्तानं नारी शक्तीचा गौरव करताना स्वातंत्र्य चळवळीत योगदान देणाऱ्या, संविधान सभेतील राष्ट्रीय ध्वजधारक हंसा मेहता यांच्या आवाजातली ध्वनिफित पंतप्रधानांनी ऐकवली. यंदाच्या महिला दिनानिमीत्त ८ मार्च रोजी, एका दिवसासाठी आपण आपली समाजमाध्यम खाती देशातल्या काही प्रेरणादायी महिलांकडे सोपवणार असल्याचं पंतप्रधान म्हणाले..

***इस बार महिला दिवस पर मैं एक ऐसी पहल करने जा रहा हूँ, जो हमारी नारी-शक्ति को समर्पित होगी। मैं अपने social media account उनको देश की कुछ inspiring women को, एक दिन के लिए सौंपने जा रहा हूँ। 8 मार्च को, वो, अपने कार्य और अनुभवों को देशवासियों के साथ साझा करेंगी।***

उत्तराखंडमध्ये झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या क्रीडापटूंचं त्यांनी अभिनंदन केलं.

एक तंदुरुस्त आणि निरोगी राष्ट्र बनण्यासाठी भारताला लठ्ठपणाच्या समस्येवरही मात करावी लागेल, असं पंतप्रधान म्हणाले.

आपल्या देशातल्या वैशिष्ट्यपूर्ण जैवविविधतेचा उल्लेख करत; आपल्या संस्कृतीतील निसर्ग आणि वन्यजीवांचं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं.

देशात सध्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरू आहेत; त्या पार्श्वभूमीवर यंदाच्या, परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाचं वेगळेपण, त्याला मिळत असलेला सकारात्मक अभिप्राय याबाबत पंतप्रधानांनी माहिती दिली.

**साहित्यसंमेलन**

दिल्लीत गेले तीन सुरू असलेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची सांगता उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत काल झाली. संमेलनाध्यक्ष डॉक्टर तारा भावळकर, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मराठी भाषेला अपेक्षित वैभव मिळवून देण्यासाठी राज्य सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करेल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली. दिल्लीत राहणाऱ्या मराठी माणसांना बोलता भेटता यावं यासाठी स्थान निर्माण केलं जाईल, त्यासाठी अर्थसंकल्पात घोषणा केली जाईल, असं पवार यांनी सांगितलं. यावेळी बोलताना ते म्हणाले ----

मराठीचा वापर सर्वच पातळ्यांवर मोठ्या प्रमाणावर होणं आवश्यक आहे असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले -----

दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात कुसुमाग्रज अध्यासन केंद्र लवकरच होईल, असं उदय सामंत यांनी सांगितलं.अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि पुण्यातील सरहद संस्थेनं आयोजित केलेल्या या संमेलनात तीन दिवस विविध विषयावरचे परिसंवाद, चर्चासत्र, कविसंमेलन आदि कार्यक्रम झाले.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात....

**<u>वेव्ज प्रोमो मुंबई</u>**

**<u>विधिमंडळअर्थअधिवेशन</u>**

राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या 3 ते 26 मार्च या कालावधीत मुंबईत होणार आहे. राज्याचा अर्थसंकल्प 10 मार्च रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडला जाईल. विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या काल झालेल्या बैठकीत अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली.

**युनेस्कोदौरा**

बारा शिवकालीन गडकिल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळांच्या यादीत समावेश करण्यासाठी आवश्यक नामांकन मिळालं आहे. नामांकनानंतर अंतिम यादीत या गडकिल्ल्यांचा समावेश व्हावा, यासाठी राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळ विश्व वारसा समितीसमोर पॅरिस इथं तांत्रिक सादरीकरण करणार आहे. या शिष्टमंडळात अपर मुख्य सचिव विकास खारगे, पुरातत्व आणि वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे उप संचालक हेमंत दळवी आणि वास्तुविशारद शिखा जैन यांचा समावेश आहे.

**निधन**

ज्येष्ठ साहित्यिक, वक्ते आणि दूरदर्शनवरील वृत्त निवेदक अनंत भावे यांचं काल पुण्यात निधन झालं. ते 88 वर्षांचे होते. वृत्तपत्रातील स्तंभलेखन, कथासंग्रहाबरोबरच त्यांनी विपुल प्रमाणावर बालसाहित्याचं लेखन केलं. अग्गड हत्ती तग्गड बंब, अज्जब गोष्टी गज्जब गोष्टी यासारखी अनेक पुस्तकं त्यांनी लिहिली. २०१३मध्ये बालसाहित्यासाठी त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला होता. त्यांच्या पार्थिव देहावर काल संध्याकाळी पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले.

**क्रिकेट**

दुबईमध्ये सुरू असलेल्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत काल भारताने पाकिस्तानचा सहा गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने सर्वबाद 241 धावा केल्या तर प्रत्युत्तर दाखल 45 चेंडू राखत विराट कोहलीच्या संयमी शतकाच्या आणि श्रेयस अय्यर च्या अर्धशतकाच्या जोरावर भारतानं हे उद्दिष्ट केवळ चार गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केले. पाकिस्तानकडून सौद शकीलने 62 धावा केल्या. भारताकडून कुलदीप यादवनं तीन तर हार्दिक पांड्यानं दोन बळी घेतले. या सामन्याद्वारे विराट कोहलीने 14 हजार धावांचा टप्पा सर्वात कमी डावात पार केला. भारताचा पुढील सामना न्यूझीलंड विरुद्ध 2 मार्च रोजी होणार आहे.

**हवामान**

दक्षिण कोकण आणि दक्षिण महाराष्ट्रात आज आकाश अंशतः ढगाळ राहील. अन्यत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**